# International Economics

## SUBJECT TEACHER

Shinde S. A.




# तुलनात्मक खर्च लाभ सिद्धांत

## (Ricardo's Theory of Comparative Cost Advantages)

– डेव्हिड रिकार्डो

डेव्हिड रिकार्डो यांनी सन १८१७ मध्ये प्रकशित केलेल्या ‘The Principles of Political Economy and Taxation’ या ग्रंथात आपला आंतरराष्ट्रीय व्यापाराचा शुद्ध सिद्धांत मांडला आहे. रिकार्डोच्या सिद्धांताचा केंद्रबिंदू म्हणजे तुलनात्मक लाभाचे तत्व होय.

आंतर राष्ट्रीय व्यापाराचे मूळ कारण म्हणजे विविध देशांत असणारी उत्पादन घटकांची भिन्नता, त्यांची उपलब्धता, नैसर्गिक घटकांची उपलब्धता व लोकांच्या गुण वैशिष्टांचा वेगळेपणा या आधारावर सनातनवादी अर्थशास्त्रज्ञानी आंतरराष्ट्रीय व्यापार विषयक सिद्धांत मांडले.

# व्याख्या :-

"ज्या वस्तूच्या उत्पादनासाठी उत्पादन खर्चात सापेक्ष लाभ मिळतो अशा वस्तूचे तो देश उत्पादन करतो व निर्यात करतो. याउलट ज्या वस्तूच्या उत्पादनाच्या बाबतीत उत्पादन खर्चात सापेक्ष तोटा होत असेल तर अशा वस्तूची तो देश आयात करतो. "

# गृहीते:-

१. दोन देश व दोन वस्तू
२. श्रम हा एकमेव उत्पादन घटक
३. एकजिनसी श्रम
४. वाहतूक खर्चाचा अभाव
५. खुला व्यापार

६. निर्हस्तक्षेपाचे धोरण

७. आंतरराष्ट्रीय पातळीवर उत्पादन घटकांच्या गतीशिलतेचा अभाव

८. स्थिर उत्पादन फल

९. दोन्ही देशांमध्ये सुवर्णपरिमाण आणि सारखेच चलन असते.

१०. पूर्ण स्पर्धा

११. पूर्ण रोजगार

# उत्पादन खर्चाच्या संकल्पना :-

रिकार्डोच्या मते, वस्तूंच्या उत्पादानाच्या खर्चा बाबतीत तीन प्रकारचे फरक दिसून येतात.

१. समान खर्च भिन्नता

२. निरपेक्ष खर्च भिन्नता

३. सापेक्ष खर्च भिन्नता

# समान खर्च भिन्नता:-

| देश | उत्पादन खर्च | उत्पादन | गुणोत्तर |
|---|---|---|---|
| भारत | १ दिवस श्रम | १० टन साखर/ ५ टन चहा | १ : 0.५ |
| श्रीलंका | १ दिवस श्रम | ८ टन साखर/ ४ टन चहा | १ : 0.५ |

# निष्कर्ष:-

१. उत्पादन खर्च समान

२. उत्पादनाचे गुणोत्तर समान

३. उत्पादन खर्च व गुणोत्तर समान असल्याने आयात निर्यात करणे लाभदायक ठरणार नाही.

४. आंतरराष्ट्रीय व्यापार होणार नाही.

# निरपेक्ष खर्च भिन्नता:-

| देश | उत्पादन खर्च | उत्पादन | गुणोत्तर |
|---|---|---|---|
| भारत | १ दिवस श्रम | १० टन साखर<br>५ टन चहा | १: 0.५ |
| श्रीलंका | १ दिवस श्रम | ५ टन साखर<br>१० टन चहा | १:२ |

# निष्कर्ष:-

१. भारताला साखर व श्रीलंकेला चहा उत्पादनात निरपेक्ष लाभ मिळतो.

२. भारताने सर्व घटक साखर निर्मितीसाठी व श्रीलंकेने सर्व घटक चहा निर्मितीसाठी वापरावेत.

३. भारताने श्रीलंकेला साखर निर्यात करावी व त्याबदल्यात श्रीलंकेकडून चहाची आयात करावी.

४. निरपेक्ष खर्च भिन्नतेमुळे आंतर राष्ट्रीय व्यापार अस्तित्वात येतो.

# सापेक्ष खर्च भिन्नता:

| देश | उत्पादन खर्च | उत्पादन | गुणोत्तर |
|---|---|---|---|
| भारत | १ दिवस श्रम | १० टन साखर/ १० टन चहा | १:१ |
| श्रीलंका | १ दिवस श्रम | ४ टन साखर/ ८ टन चहा | १:२ |

# निष्कर्ष :-

१. भारताला दोन्ही वस्तूंच्या उत्पादनात फायदा आहे.

२. श्रीलंकेला चहाच्या बाबतीत फायदा आहे.

३. भारताने साखरेच्या उत्पादनात व श्रीलंकेने चहाच्या उत्पादनात विशेषीकरण करावे.

४. भारताने साखरेची निर्यात करून चहाची आयात करावी.

# डेव्हिड रिकार्डोच्या तुलनात्मक खर्च लाभ सिद्धांतावरील टीका:

१. केवळ दोन देश – चुकीचे गृहीत
२. केवळ दोन वस्तू – चुकीचे गृहीत
३. मागणी बाजूकडील दुर्लक्ष.
४. केवळ श्रम खर्च विचारात घेतला.
५. स्थिर अर्थव्यवस्था विचारात घेतली.

६. उत्पादन घटकांची गतिशीलता विचारात घेतली नाही.

७. परावलंबित्व

८. वाहतूक खर्चाचा अभाव.

९. पूर्ण रोजगार अस्तित्वात नसतो.

१०. प्रत्यक्ष बाजारात पूर्ण स्पर्धा नसते.

# धन्यवाद

